Clarification

a, b and f- सिबिओ कडून प्राप्त demand letter व इतर अनुषंगिक कागदपत्रे हे DIU कडून प्राप्त होते. त्यामुळे सदर demand letter ची मुळ प्रत काही वेळेस DIU कार्यालयास ठेवण्यात येते किंवा कधी कधी DIU मार्फत सिबिओ demand letter व इतर कागदपत्रे शासकीय ई-मेल व्दारे या कार्यालयास प्राप्त होतात त्यामुळे ते ग्राह्य धरण्यात येतात. स्मार्ट प्रकल्पाच्या वित्तीय नियमावली नुसार फक्त मुळ Grant Agreement असणे बंधनकारक आहे.

c. RIU/DIU कडून प्राप्त शिफारस पत्रावर नमूद केलेली दिनांक हि तेथील कार्यालय प्रमुख यांची अंतिम स्वाक्षरी झालेनंतर टाकणे गरजेची असल्याने त्याप्रमाणे सदर पत्रात RIU/DIU कार्यालया मार्फत दिनांक नंतर दुरुस्ती करण्यात आलेली आहे.

d. स्मार्ट प्रकल्पाच्या वित्तीय नियमावली नुसार सद्य स्थितीत grant agreement stamp पेपर वर करणेबाबत बंधनकारक करण्यात आलेले नव्हते. त्यामुळे सिबिओ मार्फत सादर करण्यात आलेले मुळ agreement या कार्यालय मार्फत स्वीकारण्यात आलेले आहे.

e. स्मार्टप्रकल्पाच्या वित्तीय नियमावलीनुसार प्रथम हप्ता वितरीत करताना आवश्यक कागदपत्रांच्या चेक लिस्ट मध्ये सदर बाब आवश्यक नाही. परंतु दुसरा हप्ता वितरणा वेळीस सदर बाबीची पूर्तता करण्यात येईल.

g. प्रकल्प समन्वय व व्यवस्थापन कक्ष (PCMU) मार्फत Grant Agreement चे जे विहित नमुने देण्यात आले होते त्याच नमुन्यांमध्ये Grant Agreement करणे बंधनकारक असल्याने त्यानुसार कार्यवाही करण्यात आलेली आहे.

h. स्मार्ट प्रकल्पाच्या वित्तीय नियमावलीनुसार प्रथम हप्ता वितरीत करताना आवश्यक कागदपत्रांच्या चेक लिस्ट मध्ये सदर बाब समाविष्ट नसल्याने अशा प्रकारचे Resolution घेण्यात आलेले नाही.